महाराष्ट्र शासन

# जिल्हा नियोजन समिती,
# जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

ई-मेल : dpo.ah-mh@gov.in

दूरध्वनी क्रमांक : 0241-2345864

जावक क्र. जिनिस/ O/2021/Oct/AAO/01694

दिनांक - 04/10/2021

**प्रशासकीय मान्यता आदेश**

**आमदार स्थानिक विकास कार्यक्रम -पारनेर**

**विषय : आमदार स्थानिक विकास कार्यक्रम-सन 2021-2022 या योजनेंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.**

**संदर्भः-मा. आ. महोदयांचे पत्र क्र. 6050, दि. 27.07.2021**

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाच्या मार्गदर्शक कार्यप्रणालीनुसार जिल्हाधिकारी यांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे अधिकार दिले आहेत. **श्री. निलेश ज्ञानदेव लंके,विधानसभा मतदार संघ** यांचे **पारनेर** या मतदार संघाकरीता उपलब्ध होणा-या निधीतून मा.आमदार महोदयांनी प्रस्तावित केल्यानुसार व संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेकडून प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकानुसार खालील तक्त्यातील कामांना मार्गदर्शक सुचनानुसार पुढे नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**कार्यान्वयीन यंत्रणा -कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर** **(रक्कम हजारात)**

| अ. क्र. | कामाचा संकेतांक | तालुका | गाव/ शहर | कामाचे नाव | मा.आ.महोदय यांचे शिफारस पत्र क्रमांक व दिनांक | तांत्रिक मान्यता क्रमांक व दिनांक | तांत्रिक मान्यता रक्कम | प्रशासकीय मान्यता रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ML /2122 /0391 | पारनेर | टाकळी ढोकेश्वर | मौ. टाकळी ढोकेश्वर ता. पारनेर येथील टाकळी ढोकेश्वर ते जिल्हा मराठा शाळा रस्ता करणे | I/DPC/AHN// PROP/ 7202100743 27/07/2021 | 5526 27/09/2021 | 2000.000 | 1999.700 |
| 2 | ML /2122 /0392 | नगर | नागापुर | मौ. नवनागापूर ता. नगर येथील ग्रामपंचायत हद्दीत चेतना कॉलनीमध्ये विठठल रुक्मीणी मंदिरासमोर सभामंडप बांधणे | I/DPC/AHN// PROP/ 7202100743 27/07/2021 | 5429 20/09/2021 | 1000.000 | 1000.000 |
| 3 | ML /2122 /0393 | नगर | पिंपळगांव वाघा | मौ. पिंपळगांव वाघा ता. नगर येथील विठठल रुक्मीणी मंदिरासमोर ग्रामपंचायत जागेत सभामंडप बांधणे | I/DPC/AHN// PROP/ 8202100917 10/08/2021 | 5729 01/10/2021 | 1000.000 | 999.500 |
| 4 | ML /2122 /0394 | पारनेर | म्हस्केवाडी | मौ. म्हस्केवाडी ता. पारनेर येथील गणेश मंदिरासमोर ग्रामपंचायत जागेत सभामंडप बांधणे | I/DPC/AHN// PROP/ 9202101033 01/09/2021 | 5190 09/09/2021 | 1500.000 | 1499.600 |
| 5 | ML /2122 /0395 | पारनेर | लोणी मावळा | मौ. लोणी मावळा ता. पारनेर येथील मत्ताई मंदिरासमोर ग्रामपंचायत जागेत सभामंडप बांधणे | I/DPC/AHN// PROP/ 9202101033 01/09/2021 | 5190 09/09/2021 | 1500.000 | 1499.700 |
|  | ML |  |  |  | I/DPC/AHN// PROP/ | 5570 |  |  |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | /2122 /0396 | पारनेर | वरवंडी | मौ. वारणवाडी ते पट रस्ता करणे ता. पारनेर | PROP/ 8202100917 10/08/2021 | 5570 24/09/2021 | 600.000 | 599.900 |
| | | | | | | एकूण (रु. हजारात) | 7600.000 | 7598.400 |
| **या आदेशान्वये एकूण प्रशासकीय मान्यता रक्कम -अक्षरी रुपये पंच्याहत्तर लक्ष अठ्ठ्याण्णव हजार चार शे फक्त** | | | | | | | | |

वरील कामांना प्रशासकीय मान्यता ही नियोजन विभागाकडील शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनानुसार आणि पुढे नमुद केलेल्या अटी व शर्ती यांना अधीन राहून देण्यात येत आहे. सदर अटींचे पालन करणे कार्यान्वयीन यंत्रणेस बंधनकारक आहे.

**अटी व शर्ती**

1 .अंदाजपत्रकानुसार कामाची जागा जी निश्चित असेल, त्याच जागेवर काम घेण्यात यावे त्यात कुठलाही बदल करू नये. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांचे सदर कामांबाबत देखभाल दुरुस्तीचे हमीपत्र आणि बांधकामास ना-हरकत दाखला प्राप्त झाल्याशिवाय कोणत्याही कामास सुरवात करण्यात येऊ नये.

2 .आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत दुरुस्ती/ सुधारणा स्वरुपाची कामे, पुतळा सुशोभिकरण, स्वागत कमान/ प्रवेशद्वार अशा प्रकारची कामे अनुज्ञेय नसल्याने वरील कामांमध्ये अशा प्रकारच्या उपकामांचा समावेश असल्यास अशी उपकामे करु नये.

3 .आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार काम पुर्ण करण्याची मुदत काम मंजुर झाल्याच्या दिनांकापासून एका वर्षाची आहे. कार्यान्वियीन यंत्रणेस कोणत्याही परिस्थितीत कामास मुदतवाढ देता येणार नाही. कामे विहीत वेळेत पुर्ण न झाल्यास संबंधीत अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

4 .काम चालू असताना अंमलबजावणी अधिकारी यांनी स्वतः कामावर भेटी देऊन काम अंदाजपत्रकानुसार आणि ठरलेल्या कालावधीत चालू आहे याची वेळोवेळी खात्री करावी.

5 .काम पुर्ण झाल्यानंतर कामांची नोंद संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेने शासनाने विहीत केलेल्या नमुन्यात मालमत्ता नोंदवहीत स्वंतत्र घेण्यात यावी.

6 .काम पुर्ण झाल्यानंतर कामाचा पुर्णत्वाचा दाखला व कामावर केलेल्या खर्चाचे उपयोगीता प्रमाणपत्र या कार्यालयास आठ दिवसाच्या आत सादर करावेत.

7 .कामनिहाय खर्चाचा अहवाल प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेच्या आत या कार्यालयास सादर करावा.

8 .कामांची निविदा निश्चित करण्यापुर्वी कामाची जागा ही शासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या मालकीची असल्याची खात्री करुनच कामास सुरवात करावी.

9 .कामे सुरू होण्या पुर्वीचे, काम प्रगतीत असतांना आणि काम पुर्ण झाल्यानंतरचे कामांचे छायाचित्र अंतिम देयकाची मागणी करतांना या कार्यालयास सादर करावे.

10 .क्षेत्रीय अधिका-यांनी या कामाच्या प्रत्येक बांधकामास सुरूवात करण्यापुर्वी काम कोणत्याही पाटबंधारे/जलविद्युत/ पाणीपुरवठा प्रकल्पांच्या जलाशयाखाली येण्याची शक्यता नाही किंवा अशा प्रकल्पामुळे या वरील कामावर कोणताही परीणाम होणार नाही याची खात्री करून घेतली पाहीजे.

11 .प्रशासकीय मंजूर रक्कमेपेक्षा कामावर झालेला खर्च कमी असेल तर शिल्लक/बचत रक्कम काम पुर्ण झाल्यावर 30 दिवसाच्या आत या कार्यालयास परत करावी.

12 .मंजूर कामांची माहिती दर्शविणारा फलक कामाच्या दर्शनी भागावर लावणे अनिवार्य आहे.

13 .या कामाचे निरीक्षण व तपासणीचे काम संबधीत कार्यकारी अभियंत्याकडुन आणि जिल्हाधिकारी अथवा त्यांनी नियुक्त केलेल्या अधिका-याकडुन अथवा महाराष्ट्र शासन यांनी नेमून दिलेल्या अधिकारी यांच्याकडुन केली जाऊ शकेल.

14 .वरील कामांना सुरवात करण्यापुर्वी वन विभाग, पर्यावरण विभाग व शासनाचे इतर विविध विभाग यांच्या कोणत्याही अटी/नियम/कायदा यांचे उल्लंघन होणार नाही याबाबत कार्यन्वयीन यंत्रणेने खात्री करुन घेतली पाहिजे.

15 .वरील कामे पुर्ण झाल्यानंतर परीरक्षणासाठी संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेकडे ताब्यात देऊन ताबा पावती या कार्यालयास सादर करावी.

16 .सदर काम हे कोणत्याही मोठ्या कामाचा भाग नसल्याची खात्री करण्यात यावी. तसेच कोणत्याही मोठ्या कामाचे लहान भाग म्हणून कामे प्रस्तावित केलेले नाही याची कार्यान्वियीन यंत्रणांनी खात्री करुनच कामास सुरवात करावी.

17 .सदर कामांचा या खासदार स्थानिक विकास कार्यक्रमा व्यतिरिक्त इतर कोणत्याही कार्यक्रमात अथवा योजनेत कामात समावेश झालेला नाही याची खात्री करूनच काम सुरू करावे.

18 .सदर कामांची उपयुक्तता ही सार्वजनिक स्वरुपाची असावी. कामांचा वापर/ उपयोग हा खाजगी/ वैयक्तिक/ खाजगी कार्यालयीन स्वरुपाचे वापरासाठी नसावा. तसेच प्रस्तावित कामामुळे सार्वजनिक लोकोपयोगी कायमस्वरुपी मालमत्ता निर्माण झाली पाहिजे.

19 .सदर कामात खरेदीचा समावेश असल्यास शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसारच खरेदीची प्रक्रिया राबविण्यात यावी.

20 .सदर कामे ही वर नमूद केलेल्या विधानसभा/विधानपरिषद मतदारसंघाच्या विहित कार्यक्षेत्रात असल्याची खात्री करुन या कामांना सुरवात करण्यात यावी. अपवादात्मक परिस्थितीत मार्गदर्शक सुचनेनुसार काही कामे मतदार संघाच्या बाहेरील असू शकतील मात्र त्यासाठी कामाच्या नावात तसे नमुद केलेले असेल.

21 .सदर कार्यक्रमांतर्गत केवळ कामावरील खर्च अनुज्ञेय आहे. कोणताही प्रकारचा प्रशासकीय खर्च अथवा इतर खर्च उदा. सेंटेंज चाजेर्स,आकस्मिक खर्च अनुज्ञेय नसल्याने तसा खर्च या योजनेतून करण्यांत येवू नये.

22 .सदर कार्यक्रमांतर्गत खाजगी/ धार्मिक स्थळे यांचे जागेवरील कामे, कार्यालयीन वा वैयक्तिक निवासी इमारती, खाजगी/ व्यापारी संस्थांची कामे अथवा मंदीराची/ धार्मिक स्थळाची कामे अनुज्ञेय नाहीत. सदर प्रकारची कामे करण्यात येऊ नये.

23 .सदर कार्यक्रमांतर्गत दिलेली रक्कम ही प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकातील बाबींवरच खर्च करण्यात यावी. प्रशासकीय मान्यता प्राप्त रकमेशिवाय वाढीव निधी अनुज्ञेय नाही.

**(डॉ.राजेन्द्र ब. भोसले)**
**जिल्हाधिकारी**
**अहमदनगर**

**प्रति -**

कार्यान्वयीन यंत्रणा - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर

प्रत- **श्री. निलेश ज्ञानदेव लंके**,**विधानसभा मतदार संघ**, **पारनेर** यांना माहितीस्तव सविनय सादर.